# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०२/२०२५ (मंगळवार) दुपार**

---

## घरफोडी करणारे आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोस्टे कळमेश्वर :– **दिनांक १४/०१/२०२५ रोजी फिर्यादी नामे राजेश राजेंद्रनाथ बॅनर्जी ,रा ७९,के.टी नगर,काटोल जि नागपुर यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, पारडी घटाटे शिवारातील त्यांचे फार्म हाउस मधुन दिनांक १३/०१/२०२५ चे ११:०० वा ते दिनांक १४/०१/२०२५ चे ०८:०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फार्म हाउसच्या काटा फोडुन फार्महाउस मधील** एक बॉस कंपनीचे म्युझिक सिस्टम आणि हायमोनियम एकुण १,४०,०००/– रूपयेचा मुददेमाल चोरून नेला आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून आपले पोलीस स्टेशन कळमेश्वर कलम ३३१(४) , ३०५ भान्यासं चा गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास कळमेश्वर पोलीसांसोबत स्थानिक गुन्हे शाखेने सुध्दा समांतर रित्या सुरू केला असता गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती वरुन तसेच तांत्रिक पुराव्यावरून फिर्यादी कडे फॉर्म हाऊस वर पूर्वी कामाला असलेला आरोपी क्र १ राजेंद्र जगदीश लिल्हारे वय २४ वर्ष रा. गोंदिया ह. मु. रामदासपेठ नागपूर व त्याचा सोबती आरोपी क्र २ विकास बळवंतराव बनसोड वय २५वर्ष रा. कोराडी गेट न २ नागपूर या आरोपींना ताब्यांत घेवून विचारपूस केली असता दोन्ही आरोपीतांनी मिळुन गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीच्या ताब्यातुन १) एक बॉस कंपनीचे म्युझिक सिस्टम किमती १,२०,०००/– रूपये २) एक लाकडी हार्मोनियम वाद्य साहित्य किमती २०,०००/– रूपये ३)एक होंडा लिवो वाहन मो सा.क्र.एम एच ४० सी पी २८४७ किमती ५०,०००/– रूपये असा एकूण मुद्देमाल १,९०,०००/– रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कळमेश्वर पोलीसांनी दोन्ही आरोपीतांना गुन्हयाच्या तपासकामी अटक केली आहे.

## पेंच व्याघ्र प्रकल्प सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण व पेंच व्याघ्र प्रकल्प अधिकारी यांची संयुक्तिक बैठक

आज दिनांक. ०४/०२/२५ रोजी मा. श्री.हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक सा,नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर व मा.श्री. प्रभुनाथ शुक्ल, उपसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांची सयुक्तीक बैठक मध्ये तोतलाडोह धरणात अवैध मासेमारी बंद कशी करता येईल याबाबत चर्चा झाली तसेच दि.०७/०१/२५ रोजी तोतलाडोह धरणाजवळ जळालेल्या बोटी संदर्भाने पोस्टे देवलापार येथे दाखल गुन्हयाच्या तपासाचा आढावा घेतला.

वनविभागाने राज्य आपत्ती व्यवस्थापण बल यांचेशी समन्वय साधून ना.ग्रा पोलीस दल व वनविभागानी संयुक्तीक ऑपरेशन राबवून तोतलाडोह धरणामधील दोन जवळच्या टेकडी मध्ये पाण्यात फिजीकल फलोटींग बॉईज चे बॅरीअर चा प्रस्ताव वनविभागाने तयार करणे. तरी या संदर्भाने उपाय योजना झाल्याबाबतचा आढावा दोन महिन्यानंतर पुन्हा बैठकीत घेण्यात येईल.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर